# मुकुल माधव फाउंडेशनतर्फे सुपराजायंट खेळाडूंना भेट

कोल्हापूर (प्रतिनिधी):- गल्फ लुब्रिकंट्स इंडिया लिमिटेड (जीओएलआयएल)ने, फिनोलेक्स इंडस्ट्री लिमिटेडचा तूक बस गल्फ फॅन बस मधून आरपीएसच्या टीमला भेटण्यासाठी मुलांना संस्थेतून कार्यक्रमाच्या ठिकाणी आणण्यात की, आयच्या संपूर्ण प्रकल्पात, खेळांनीच मुले सबळ होऊ शकतात हे आम्ही पाहात आलोय, त्यांच्यात कमालीचे परिवर्तन



सीएसआर प्रकल्प असलेल्या युकुल माधव फाउंडेशनबरोबर भागीदारी केली आहे, याअंतर्गत अपंग कल्याणकारी शिक्षण संस्थेच्या विशेष मुलांसाठी, पुणेस्थित आयपीएल फ्रांचाइजीच्या राइजिंग पुणे सुपरजायंटच्या खेळाडूंबरोबर संवादात्यक कार्यक्रयाचे आयोजन करण्यात आले होते. स्टीव्हन स्मिथ,दु प्लेसिस आणि जयदेव उनाडकत हे टीमचे स्टार खेळाडू यासाठी उपस्थित होते. तसेच ते एनजीओच्या ३० मुलांबरोबरच्या धमाल कार्यक्रमात सहभागीही झाले होते.

आरपीएसच्या अधिकृत वाहतूक बस गल्फ फॅन बस मधून आरपीएसच्या टीमला भेटण्यासाठी मुलांना संस्थेतून कार्यक्रमाच्या ठिकाणी आणण्यात आले. येथे मुलांनी खूप धमाल खेळ खेळले आणि क्रिकेटपटूंबरोबर प्रत्यक्ष खेळण्याची संधीही त्यांना उपलब्ध झाली.

मुलांमधील स्वप्ने फुलावीत यासाठी हा संवादात्यक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, यासाठी धकाधकीच्या वेळापत्रकातून खेळाडूंनी वेळ काढला होता. आपल्या आवडत्या खेळाडूंना भेटण्यासाठी युले अतिशय उत्सुक होती.

यानिमित्ताने, फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या संचालक आणि मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीयती रितु छाब्रिया म्हणाल्या की, आयच्या संपूर्ण प्रकल्पात, खेळांनीच मुले सबळ होऊ शकतात हे आम्ही पाहात आलोय, त्यांच्यात कमालीचे परिवर्तन यामुळे घडते. आम्ही दीर्घ काळापासून अपंग कल्याणकारी शिक्षण संस्थेबरोबर संलग्रित आहोत आणि आमच्या प्रकल्पा साठी आमच्या मुलांना भेटायला आंतरराष्ट्रीय ख्यातीचे क्रिकेटपटू आल्याने आम्हाला अतिशय आनंद झाला. आम्हाला मुलांना विश्वास द्यायचा आहे की, काहीही अशक्य नाही आहे. पुण्यातील ट्राफिक पोलिसांसाठी यशस्वी हेल्मेट ड्रायव्ह केल्यावर गल्फ ऑईल बरोबर हा दुसरा प्रकल्प केला आहे आणि मी त्यासाठी त्यांचे आभार मानते; त्यांच्याशिवाय हा कार्यक्रम शक्य झाला नसता असेही त्या म्हणाल्या.